क्रमांक : १४८५ /ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २७ जानेवारी, २०२२.

**:: परिपत्रक ::**

**विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरीता नेमून देण्यात आलेल्या दिनांकाबाबतचे विवरणपत्र**

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजीपासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होणार आहे. सोमवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ ते शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ या कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तराबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र (मागील पृष्ठावर छापल्याप्रमाणे) आपल्या माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत असून या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**(१) मा.मंत्री यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी नेमून देण्यात आलेले दिनांक.**

**(२) महाराष्ट्र विधानपरिषद तारांकित प्रश्नांची उत्तरे QIS या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने या सचिवालयाने ठरवून दिलेल्या मुदतीत पाठविण्यात यावीत.**

**(३) तारांकित प्रश्नांची उत्तरे या सचिवालयास मिळण्याचा अंतिम दिनांकापर्यंतच संपुर्ण ऑनलाईन पध्दतीव्दारे पाठविण्यात यावीत. सदर उत्तराची जबाबदारी ही संबंधित विभागाची असल्यामुळे एकदा ऑनलाईन उत्तर दिल्यानंतर सदर उत्तर हे अंतिम उत्तर असे ग्राह्य धरण्यात येईल.**

**(४) तारांकित प्रश्न अन्य विभागाकडे हस्तांतरित होत असल्यास, प्रश्नाच्या हस्तांतरणाची कार्यवाही प्रश्न विभागास प्राप्त झाल्यानंतर त्वरित करण्यात यावी, जेणेकरुन प्रश्न ज्या विभागाला हस्तांतरित झाला आहे त्या विभागास विहीत मुदतीत उत्तर पाठविणे सोयीचे ठरेल.**

धजगताप

**(धनश्री जगताप)**
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

(१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
(२) मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
(३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
(४)सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित

महाराष्ट्र विधानपरिषद
प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२
तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक तसेच विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक
इत्यादीबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | विभागाकडून उत्तर येण्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) गृह मंत्री<br>(२) महसूल मंत्री<br>(३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(४) कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री<br>(५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री<br>(६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | सोमवार, दिनांक, ७ मार्च, २०२२<br>सोमवार, दिनांक, १४ मार्च, २०२२<br>सोमवार, दिनांक, २१ मार्च, २०२२<br>* सोमवार, दिनांक, २८ मार्च, २०२२ | सोमवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२<br>सोमवार, दिनांक ०७ मार्च, २०२२<br>सोमवार, दिनांक १४ मार्च, २०२२<br>*सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२ |
| दोन | (१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>(३) अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री<br>(४) शालेय शिक्षण मंत्री<br>(५) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री<br>(६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(७) परिवहन, संसदीय कार्य मंत्री<br>(८) पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार मंत्री | मंगळवार, दिनांक, ८ मार्च, २०२२<br>मंगळवार, दिनांक, १५ मार्च, २०२२<br>मंगळवार, दिनांक, २२ मार्च, २०२२<br>* मंगळवार, दिनांक, २९ मार्च, २०२२ | सोमवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२<br>मंगळवार, दिनांक ०८ मार्च, २०२२<br>मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२<br>*मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ |
| तीन | (१) मुख्यमंत्री<br>(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(३) गृहनिर्माण मंत्री<br>(४) नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | बुधवार, दिनांक ०२ मार्च, २०२२<br>बुधवार, दिनांक ०९ मार्च, २०२२<br>बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२<br>बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२<br>* बुधवार, दिनांक ३० मार्च, २०२२ | सोमवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२<br>बुधवार, दिनांक ०२ मार्च, २०२२<br>बुधवार, दिनांक ०९ मार्च, २०२२<br>मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२<br>*बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२ |
| चार | (१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री<br>(२) ऊर्जा मंत्री<br>(३) इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री<br>(४) आदिवासी विकास मंत्री<br>(५) सहकार, पणन मंत्री<br>(६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री | गुरुवार, दिनांक ०३ मार्च, २०२२<br>गुरुवार, दिनांक १० मार्च, २०२२<br>गुरुवार, दिनांक १७ मार्च, २०२२<br>गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२<br>* गुरुवार, दिनांक ३१ मार्च, २०२२ | मंगळवार, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२<br>गुरुवार, दिनांक ०३ मार्च, २०२२<br>गुरुवार, दिनांक १० मार्च, २०२२<br>गुरुवार, दिनांक १७ मार्च, २०२२<br>*गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२ |
| पाच | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(४) ग्रामविकास व कामगार मंत्री<br>(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(६) महिला व बालविकास मंत्री<br>(७) मृद व जलसंधारण मंत्री | शुक्रवार, दिनांक ०४ मार्च, २०२२<br>शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२<br>शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२<br>* शुक्रवार, दिनांक ०१ एप्रिल, २०२२ | शुक्रवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२<br>शुक्रवार, दिनांक ०४ मार्च, २०२२<br>गुरुवार, दिनांक १७ मार्च, २०२२<br>*शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ |

* आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ ते शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून एक आठवड्याच्या जादा प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.